

# वैभवशाली देश लिश्टनश्टाईन

ऑंकार झांजे

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

## वैभवशाली देश

# लिश्टनश्टाईन

प्रवासवर्णन

## ओंकार झांजे

# वैभवशाली देश लिश्टनश्टाईन

(प्रवासवर्णन)

**लेखक: ओंकार अशोक झांजे**

मु. पो. बारसगाव, ता. महाड, जि. रायगड, महाराष्ट्र, भारत
४०२ ३०२

इंस्टाग्राम: kshitij_antariche, __omkar_zanje__

omkar.zanje1@gmail.com

संपर्क क्रमांक - 7770099295

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक:

# ई साहित्य प्रतिष्ठान

ईलेवन्थ फ़्लोअर,
ईटर्निटी,
ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

प्रकाशन : ३० ऑगस्ट २०२४

©esahity Pratishthan®2024

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## लेखक परिचय

**लेखक- ओंकार अशोक झांजे**

शिक्षण - पदविका: डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, इन्स्टिट्यूट ऑफ पेट्रोकेमिकल इंजीनियरिंग, लोणेरे
पदवी: ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटीचे इन्स्टिट्यूट ऑफ इन्फोर्मेशन टेक्नोलॉजी, पुणे



नमस्कार, मी ओंकार अशोक झांजे

सध्या मी वॅन्डरलॅंडे (Vanderlande) ह्या कंपनीत सहायक विद्युत अभियंता (Associate Lead Engineer) म्हणून कार्यरत आहे. कामाच्या निमित्ताने अनेक देशांत फिरण्याची संधी मिळाली. मला पुस्तके वाचायला आणि फिरायला खूप आवडते. माझ्या ह्या जग भ्रमंती मध्ये जे जे अनुभव आले ते वाचकांपर्यंत पोचवायला आवडेल.

कोकणातलं रायगड किल्याच्या सहवासात असलेलं महाड हे माझं गाव. (सध्या सारखं चर्चेत असल्याने तुम्ही खूप वेळा ऐकलं असेल) मी पुणे इथुन विद्युत अभियांत्रिकी पदवीचे शिक्षण पूर्ण केले आहे. शाळेत असल्यापासून पुस्तकं वाचण्याची खूप आवड होती. तेव्हा वाचलेल्या पुस्तकांपैकी माझी आवडती पुस्तके म्हणजे रणजित देसाई यांचे श्रीमान योगी, वीणा गवाणकर यांनी अनुवादित केलेलं 'एक होता कार्व्हर', कलामांचं 'अग्निपंख' इ. पुढे डिप्लोमाला गेल्यापासून मराठी वाचन थांबलं. कारण अनेक इंजिनीयरिंग कॉलेजच्या लायब्ररीत मराठी

(वाचण्याजोगी) पुस्तके नसतात. (हीच खंत) पुढे इंटरनेटवरून माझी ओळख ईसाहित्य प्रतिष्ठानशी झाली आणि पुन्हा एकदा मराठी वाचनाच्या प्रेमात बुडालो. मी पहिलं वाचलेलं ईबुक स्मिता पाटील यांचे 'कलाटणी' माझं अजूनही आवडतं पुस्तक आहे. माझ्या लेखनाबद्दल सांगायचं झालं तर लहानपणी छोट्या छोट्या काल्पनिक कथा लिहायचो. या शिवाय मला कविता लिहिण्याचा छंद आहे.

पण तेव्हा हे सगळे लिखाण कुठेच प्रकाशित केले नव्हते. द्वितिय वर्षाच्या इंजिनीयरिंगच्या परीक्षा झाल्यानंतर सहज डायरी लिहायला बसलो आणि मला ओम्लि २०५० ही कथा सुचली व मी ती पटकन लिहून काढली. मग टाईप करून माझ्या जवळच्या व्यक्तींना दाखवली व त्यांना ती खूप आवडली. ही कथा ईसाहित्य प्रतिष्ठानतर्फे प्रकाशित करण्यात आली आणि तिला उदंड प्रतिसाद मिळाला. तिथुन पुढे मग मी कथा लिहिणे सुरु ठेवले. त्यानंतर पाहिले न मी तुला, मैत्री विजेशी भाग १ व २ प्रकाशित झाले. 'पाहिले न मी तुला' या २०१८ मध्ये प्रकाशित झालेल्या पुस्तकाला वाचकांनी भरभरून प्रेम दिलं. लॉकडाऊनच्या काळातसुद्धा वाचकांचे मेल येत होते. अजूनही येत आहेत. आजवर ईसाहित्यवर माझी सहा पुस्तके प्रकाशित झाली. या सर्वच ईबुक्सना खुप चांगला प्रतिसाद मिळाला. वैभवशाली लिश्टनश्टाईन देश' हे माझे सातवे पुस्तक. मी आजवर म्हणजे वयाच्या सव्वीस वर्षांत चौदा देश फ़िरलो आहे. पण लिश्टनश्टाईन हा देश अगदी अनोखा वाटला.


हे प्रवासवर्णन आपल्यापर्यंत पोहोचवल्याबद्दल ईसाहित्य प्रतिष्ठानचे आणि सुनील सामंत सर यांचे खूप खूप आभार. आणि सगळयात महत्त्वाचे ज्यांनी बालपणापासून माझ्यावर वाचनाचे संस्कार केले व माझे आयुष्य समृद्ध केले अशा माझ्या प्रिय आई वडिलांचा मी सदैव ऋणी राहील. हे पुस्तक आपल्याला नक्कीच आपलेसे वाटेल अशी आशा करतो आणि आपली रजा घेतो.

आपल्या प्रतिक्रियांची वाट पाहत आहे...

लेखक: ओंकार अशोक झांजे
मु. पो. बारसगाव, ता. महाड, जि. रायगड, महाराष्ट्र, भारत
४०२ ३०२
इंस्टाग्राम: kshitij_antariche, __omkar_zanje__
omkar.zanje1@gmail.com
संपर्क क्रमांक - 7770099295

# ओंकार झांजे यांची प्रकाशित पुस्तके


## कव्हरवर क्लिक करा फ़क्त एकदा











# वैभवशाली देश लिश्टनश्टाईन

ओंकार झांजे



# अर्पणपत्रिका

## सजग आणि डोळसपणे भटकंती करणाऱ्या सर्व भटक्यांना समर्पित



मनोगत



सर्व वाचकांना सप्रेम नमस्कार! आपल्यापैकी बऱ्याच जणांना फिरायला आवडतं. काहींना ट्रेकिंग आवडतं, काहींना देवदर्शन, काहींना समुद्रकिनारे, तर काहींना नुसतेच बाहेर कुठेतरी! वाचल्याने आणि फिरल्याने आपलं जगणं आणखी समृध्द होतं असं मला वाटतं. ह्या पुस्तकात मी भेट दिलेल्या एका अनोख्या देशाचे प्रवासवर्णन तुमच्यासमोर मांडत आहे. मी आत्तापर्यंत पाहिलेल्या चौदा देशांपैकी हा सर्वांत लहान देश.

हा देश परिकथेतल्या कल्पनेप्रमाणेच मोहक आहे. या देशाचे सैन्य नाही. देशात विमानतळ नाही. आपल्यासारखाच या देशाचा राष्ट्रीय दिवस १५ ऑगस्ट आहे. अशा अनेक गमतीजमती आहेत. हा सर्व प्रवास आणि ह्या देशातल्या अनोख्या गोष्टी तुम्हाला ह्या पुस्तकात वाचायला मिळतील.

हे प्रवासवर्णन आपल्या सगळ्यांना वाचायला आवडेल अशी आशा करतो.

धन्यवाद!

## लिश्टनश्टाईन देश

बऱ्याचदा आपण काही ठिकाणी ठरवून प्रवास करतो. काही वेळा अशीच भटकंती करताना वाटेत एक वेगळाच खजिना सापडतो ज्याची आपण कल्पनाच केली नसते. हे प्रवासवर्णन अशाच एका ठिकाणाचे आहे. कामाच्या निमित्ताने मला अनेक देश फिरण्याची संधी मिळाली. त्यापैकी हा एक. ही गोष्ट आहे २०२२ सालची. तेव्हा कामानिमित्त मी जर्मनीला गेलो होतो. बरेच महिने झाले होते आणि आता तिथे व्यवस्थित रूळलो होतो. सोबत कंपनीतले अनेक सहकारी सुद्धा होते. त्यामुळे आम्ही जर्मनीत राहायच्या ठिकाणी जणू छोटीशी भारतीय वसाहतच वसवली होती. हिवाळा ऋतू पाहून झाला. बर्फवृष्टी थांबली आणि हळूहळू उन्हाळ्याची चाहूल लागली.

जर्मनी देश युरोप खंडात आहे आणि युरोपमध्ये असे अनेक छोटे-मोठे देश आहेत. क्षेत्रफळाने छोटे असल्याने आजूबाजूच्या देशात जायला फारसा वेळ लागत नाही. शेंजेन विजा काढला की युरोपमधल्या बऱ्याचशा देशात फिरता येतो. त्यामुळे मोठी सुट्टी आली की आजूबाजूचे देश फिरून घ्यायचे असं आम्ही ठरवलं होतं.

आणि एकदा चार दिवसांची जोडून सुट्टी आली. मग लगेच आम्ही फिरायला जायचा प्लॅन केला. आमचा मूळ प्लॅन होता इटली देशात जाणे. पण हा प्रवास खूप लांब होता त्यामुळे आम्ही थांबत थांबत वाटेतली ठिकाणे पाहत जायचं ठरवलं. यावेळेस माझ्यासोबत माझे सीनियर अर्णब, त्यांची पत्नी व प्रत्युष हे होते. आमच्याकडे कार होती आणि तिच्याने आम्ही हा प्रवास करणार होतो. जसं आपल्याकडे प्रत्येक घरात एक बाईक तरी असतेच तसे युरोपमध्ये प्रत्येक घरात कमीत कमी एक कार तरी असते. देशातल्या मोठ्या शहरांमध्ये ये-जा करायला ट्रेन असतात. पण त्या खूप महाग असतात. मी एकदा पॅरिसला गेलो होतो तेव्हा विमानाचे तिकीट ट्रेनपेक्षा स्वस्त होतं म्हणून विमानाने गेलो होतो. बसने सार्वजनिक वाहतूक म्हणावी तितकीशी सोयीस्कर नाही. त्यामुळे कार त्या मानाने प्रवासाला बरी पडते. अखेर प्रवासाचा दिवस जवळ आला.

१६ जून २०२२

भल्या पहाटे पाच वाजता उठून आम्ही प्रवासाला सुरुवात केली. आमचं घर हे जर्मनीच्या दक्षिणेला असल्याने देशाची सीमारेषा आम्हाला खूप जवळ होती. साधारणतः दोन अडीच तासात आम्ही जर्मनी देशाला निरोप दिला. नवीन देशात खूप गोष्टी नवीन असतात. त्यामुळे सर्व गोष्टी प्रवासाआधी माहीत करून घेणे गरजेचे आहे. त्या देशातल्या स्थानिक लोकांकडून तिथे नियम, संस्कृती माहीत करून घेणे

सर्वांत उत्तम. युरोपमध्ये दोन देशांमधली सीमा ओलांडताना एक वेगळा टोल भरावा लागतो. आणि त्यासाठी गाडीवर एक स्टिकर लावावा लागतो. त्याला विग्नेट असं म्हणतात. हा थोडाफार आपल्या फास्टॅगसारखाच असतो. तो गॅस स्टेशनवर काही युरो देऊन मिळतो. तर हा विग्नेट आपल्या कारच्या समोरच्या काचेवर दिसेल असा चिकटवायचा असतो. आपली गाडी जेव्हा त्या देशाची बॉर्डर क्रॉस करून दुसऱ्या देशात जाईल तेव्हा आपोआप हा स्टीकर डिटेक्ट होतो आणि त्याची नोंद होते. फक्त जायचे आहे की जाऊन परत यायचे आहे हे विग्नेट खरेदी करताना सांगावं लागतं. बरं याच्या मागची गोष्टसुद्धा फार रंजक आहे. मागच्या वेळेस माझे सहकारी असेच एका दुसऱ्या देशात फिरायला गेले होते आणि त्यावेळी त्यांना या विग्नेट टोल विषयी माहिती नव्हती. त्यांनी डायरेक्ट गुगल मॅपमध्ये दुसऱ्या देशातले शहर टाकले आणि सरळ तिथपर्यंत प्रवास केला. वाटेमध्ये त्यांना बॉर्डर सुद्धा लागली परंतु तिथे त्यांना कोणीच अडवले नाही. त्यामुळे इथे टोल भरावा लागतो याची त्यांना काही एक कल्पना नव्हती. त्यानंतर ट्रीप करून परत आल्यानंतर साधारणतः महिना उलटून गेला आणि त्यांच्या कंपनीतल्या ईमेल ॲड्रेसवर एक ईमेल आला. हा ईमेल पत्ता त्यांनी कार घेताना तिथे नोंदवला होता. त्यावर भली मोठी युरो मधली रक्कम दंड म्हणून त्यांच्या नावे जमा झाली होती. असा त्यांना ईमेल आलेला. त्यानंतर त्यांना हे सगळं प्रकरण कळून चुकले की कोणत्याही देशाची सीमा पार करताना त्यांना हा टोल भरावा लागतो आणि हा टोल अगोदरच आपल्या कारवर स्टिकर विकत घेऊन लावावा लागतो आणि जर तो भरला नाही तर खूप मोठी रक्कम आपल्याला चुकती करावी लागते. तर मागच्या वेळेस शिकलेला धडा लक्षात ठेवून आम्ही ह्या वेळेस जर्मनी देशाची सीमा ओलांडण्यापूर्वी जवळच्याच एका गॅस स्टेशनवर हा विग्नेट स्टिकर विकत घेतला आणि समोरच्या काचेवर चिकटवला.

अशाप्रकारे जर्मनी देशाची सीमा ओलांडली आणि आम्ही ऑस्ट्रीया या देशात आलो. अगदी थोड्या वेळासाठीच आम्ही या देशाच्या छोट्या भागात होतो. तिथे गाडीतून उतरून थोडावेळ विश्रांती घेतली आणि पुढे निघालो. वाटेमध्ये अजून एक नवीन देश लागला. जेव्हा गुगल मॅप वर पाहिलं तेव्हा कळलं हा देश क्षेत्रफळाने खूप लहान आहे म्हणजे अगदीच आपल्या मुंबई शहराइतका आहे.




गाडीतून बाहेर दिसणारे दृश्य हे काही वेगळेच होते. जर्मनीच्या दक्षिणेला आल्प्स पर्वतरांग आहे. तिथे खूप बर्फ असतो. याच पर्वतरांगेमध्ये हा छोटासा देश लपलेला आहे. या देशाच्या दुसऱ्या बाजूला स्वित्झर्लंड देश आहे. तर अशा प्रकारे वेगवेगळे देश पार करत आम्ही इटलीला जाणार होतो. आता समोर इतका सुंदर देश आला त्यामुळे त्याबद्दल आम्हाला कुतूहल निर्माण झालं. मग तिथेच थांबून आम्ही त्या देशामध्ये थोडं फिरायचं ठरवलं.



या देशाचा बहुतांश भाग हा डोंगराळ आहे आणि अगदी थोड्याच भागामध्ये



लोकांची वस्ती आहे. परत आल्यानंतर जेव्हा या देशाविषयी संपूर्ण माहिती काढली तेव्हा अजून आश्चर्यचकित व्हायला झाले. कारण की क्षेत्रफळाने सर्वांत कमी असलेल्या देशांच्या यादीत ह्या देशाचा जगामध्ये सहावा क्रमांक लागतो. मात्र जीडीपी सकल राष्ट्रीय उत्पन्न (दरडोई उत्पन्न) ह्यामध्ये हा देश पहिल्या तीन देशांत येतो. इथे खूप श्रीमंत लोक राहतात.

युरोपमधलं हवामान थंड आहे. त्यामुळे येथे गुलाबाची झाडे बऱ्याच संख्येने दिसतात. ह्या देशात उतरल्या उतरल्या दुतर्फा गुलाबाची झाडे पसरलेली होती. देशाचं नाव आहे लिश्टनश्टाईन किंवा लिक्टनस्टाईन. या देशांमध्ये प्रामुख्याने जर्मन भाषा बोलली जाते. या देशाची राजधानी आहे फाडूज किंवा वडूज शहर. या शहरामध्ये एक छोटासा किल्ला आहे. ज्याला वडूजचा किल्ला म्हणतात. तो उंच डोंगरावर बांधलेला आहे.

जेव्हा आम्ही या देशामध्ये प्रवेश केला त्यावेळी रस्त्यावरून जाताना दूरवर त्या डोंगरावर हा किल्ला आम्हाला खुणावत होता.

ह्या किल्ल्याला पाहून मला जर्मनीतल्या नॉयश्वानस्टाईन किल्ल्याची आठवण झाली. पण त्या किल्ल्यासारखा तोच!

दूरवर हा किल्ला दिसल्यावर सरळ त्याच दिशेने आम्ही आमची गाडी वळवली. एक संपूर्ण देश किंवा एक संपूर्ण शहर आपण पाहतोय असं वाटतच नव्हतं. कारण इथली वस्ती आपल्या इकडच्या गावांपेक्षाही विरळ होती.


सगळीकडेच झाडेच झाडे आणि त्यामध्ये मनमोहक रंगीत घरे नजरेस पडत होती. बाहेरचं वातावरण किंचित थंड होतं. मे महिना होता तरीसुद्धा इतकी गर्मी नव्हती. या किल्ल्यापर्यंत जायला खूप मोठी चढण आणि अरुंद रस्ता आहे. या



चढणीवरून हळूहळू जात आम्ही शेवटी त्या किल्ल्याजवळ पोहोचलो. इथे जायला अजिबात गर्दी नव्हती कारण तिथे खूप कमी पर्यटक होते. मग त्या ठिकाणी आम्ही उतरलो आणि आमची गाडी रस्त्याच्या बाजूला लावली.

हा किल्ला उंचावर असल्याने दूरवर संपूर्ण देश नजरेस पडत होता. दूरवर आल्प्स शिखरावर बर्फ दिसत होता आणि ते फार आल्हाददायी दृश्य होते. क्षणभरासाठी वाटलं की इथेच घर घेऊन राहावं. पण त्यानंतर आठवलं की या देशांमध्ये फक्त अतिश्रीमंत लोकच राहतात. बाकी कोणीच इथे राहू शकत नाही. थोडेफार फोटोसेशन केलं. त्यानंतर या देशाची थोडीफार माहिती काढली.






हा या देशाचा नकाशा आहे.

हा या देशाचा झेंडा आहे.



लिश्टनश्टाईन या देशामध्ये इथे संविधानिक राजेशाही आहे. तसेच कायदेमंडळसुद्धा आहे. म्हणजे या देशाचा प्रमुख इथला राजपुत्र आहे. हा किल्ला इथल्या राजपुत्राचे अधिकृत निवासस्थान आहे. सध्याच्या राजपुत्राचे नाव आहे प्रिन्स हँस ॲडम दुसरा. या देशाचे क्षेत्रफळ फक्त १६० किमी वर्ग इतकं आहे आणि या देशाची लोकसंख्या फक्त चाळीस हजार इतकीच आहे. या देशाचा साक्षरता दर सुद्धा १००% आहे आणि यात कोणतंच आश्चर्य नाही.

या देशाचे चलन स्विस फ्रँक हे आहे. या देशात प्रामुख्याने ख्रिश्चन धर्माचे लोक राहतात आणि सुमारे ८० टक्के लोकांचा धर्म हा ख्रिश्चन आहे. जीडीपी नॉमिनल किंवा दरडोई उत्पन्न मध्ये या देशाचा जगात पहिला क्रमांक लागतो. तर जीडीपी ग्रॉस मध्ये

ह्या देशाचा तिसरा क्रमांक लागतो. दरडोई उत्पन्न हे मानांक त्या देशातील लोकांचे उत्पन्न दर्शवते. तसेच एखादा देश किती राहण्यायोग्य आहे आणि तिथे किती मूलभूत सुविधा आणि सुखसोयी आहेत ह्या गोष्टीसुद्धा विचारात घेतल्या जातात.

हा देश दुहेरी भूपरिवेष्टित आहे. भूपरिवेष्टित देश म्हणजे असा देश जो सर्व बाजूंनी इतर देशांनी वेढलेला आहे. म्हणजे ह्या देशांमधून समुद्र गाठायला एक तरी देश ओलांडावा लागतो. तर

दुहेरी भूपरिवेष्टित देश म्हणजे असे देश जिथून समुद्र गाठायला किमान दोन देश तरी ओलांडावे लागतात. जगात असे फक्त दोनच देश आहेत. एक आशिया

खंडातला उझबेकिस्तान आणि एक युरोपमधला लिश्टनश्टाईन. इंग्रजीत त्यांना डबल लँडलॉक कंट्री असे म्हणतात.

या देशात मुख्यतः डोंगराळ भाग असल्यामुळे हा देश जैवविविधतेने नटलेला आहे. या देशांमध्ये ऑर्किड आणि गुलाबाचे वेगवेगळे प्रकार पाहायला मिळतात. द्राक्षे आणि मका यांची लागवड इथे मोठ्या प्रमाणावर करण्यात येते. रस्त्याने जाताना आपल्याला अनेक द्राक्षांच्या बागा किंवा वाईन यार्ड पाहायला मिळतात. तिथून फिरताना पक्ष्यांचा किलबिलाट कानात गुंजत होता. इतर सर्व वातावरण शांत आणि प्रसन्न होते.

तिथे थोडा वेळ घालवला आणि मग आम्ही खाली या मुख्य शहराकडे उतरू लागलो. वडूज हे शहर सुद्धा अत्यंत छोटेखानी शहर आहे. थोड्याफार उंच इमारती, दुकाने येथे दिसतात. मात्र त्या अतिशय नेटनेटक्या आणि सुबक आहे. शिवाय हा संपूर्ण परिसर हा निसर्गाने वेढलेला आहे. तीव्र उतार लागला आणि आम्ही सावकाश गाडी खाली नेऊ लागलो. रस्त्याच्या बाजूला काही सुंदर शिल्पेसुद्धा ठेवली होती. रस्तेसुद्धा अगदी व्यवस्थित होते. कुठेच खड्डे वगैरे काही नव्हते. वाटेमध्ये अनेक घरे लागली. या घरांची कुंपणेसुद्धा चारी बाजूने वेलींनी वेढलेली होती. या वेली प्राजक्ताच्या आहेत असं वाटत होतं. असा हा नजारा पूर्ण शहरामध्ये पाहायला मिळाला. शेवटी आम्ही खाली पोचलो. रस्त्याच्या बाजूला मोकळ्या जागेत गाडी पार्क केली.

गाडीतून बाहेर येताच मुसळधार पावसाला सुरुवात झाली. प्रवासामध्ये असे अनपेक्षित धक्के बऱ्याच वेळा मिळतात. उन्हाळा सुरू झाल्याने आम्ही छत्र्या घेतल्या नव्हत्या. आता निसर्गासमोर हार मानून थांबण्याशिवाय काहीच पर्याय नव्हता. आम्ही एका दुकानाचा आडोसा घेतला आणि चौघेजण तसेच पाऊस कमी व्हायची वाट बघू लागलो.




जवळपास दहा-पंधरा मिनिटे उलटले असतील आणि त्यानंतर पाऊस थांबला. आम्ही सुटकेचा निश्वास सोडला. युरोपमध्ये मी बरेच दिवस राहिलो पण तिथे कधी मुसळधार पाऊस पाहायला मिळाला नाही. कोकणातला असल्याने लहानपणापासूनच धो धो कोसळणारा पाऊस पहायची सवय आहे. त्यामानाने

इथला पाऊस एकदम क्षुल्लक वाटला. हो पण बर्फवृष्टी मात्र खतरनाक होती आणि ती परदेशातच मी पहिल्यांदा अनुभवली.

ह्या देशाच्या अजून काही रंजक गोष्टी माहीत पडल्या. इथे गुन्ह्याचा दर अत्यंत कमी आहे. देशात शेवटचा खून १९९७ साली झाला होता. गुन्हे कमी होत असल्याने साहजिकच इथल्या तुरुंगात खूप कमी कैदी आहेत. ह्या देशाकडे स्वतःचे सैन्य नाही. फक्त पोलीस आहेत. त्यांची एकूण संख्या फक्त १२५ आहे. नकली दातांच्या उत्पादनात हा देश जगात आघाडीवर आहे.

इथली दुपारची जेवणाची अधिकृत वेळ बारा ते दीड इतकी आहे. असा ९० मिनिटांचा मोठा लंच ब्रेक देणारा हा जगातला पहिल्या क्रमांकाचा देश आहे.

इथे पर्यटकांसाठी काही खास सूचना आहेत. दुपारी बारा ते दीड आणि रात्री दहा नंतर इथे कोणताच गोंगाट किंवा आवाजाचे काम करायला मनाई आहे. शांतता जपण्यात यावी हा ह्याच्या मागच्या उद्देश आहे. जर्मनीत सुध्दा असे शांत तास सक्तीने पाळले जातात. ही गोष्ट आपल्याकडे लागू करता आली तर किती बरं होईल.

या देशात एकही विमानतळ नाही. त्यामुळे विमानाने इथे जाता येत नाही. मात्र स्वित्झर्लंडमधले झुरिक इथले विमानतळ इथून तासाभराच्या अंतरावर आहे.

१५ ऑगस्ट हा इथला राष्ट्रीय दिवस आहे. या दिवशी इथला राजपुत्र अख्ख्या देशाला आपल्या राजवाड्यावर होणाऱ्या पार्टीसाठी आमंत्रित करतो. आणि या दिवशी इथल्या गार्डनमध्ये नाच गाणी, वाईन यांचा उत्सव सर्वांना साजरा करता येतो. हा सगळा खर्च इथल्या सरकारकडून करण्यात येतो.



पाऊस थांबल्यामुळे आम्ही पुन्हा एकदा पायी भटकंतीला सुरुवात केली. या शहरामध्ये उतरल्यानंतर समोर एक छोटी ट्रेन दिसली. ही जागा फोटो काढण्यासाठी

खूप सुंदर आहे. याशिवाय इथे अनेक छोटी छोटी दुकानं सुद्धा आहेत. इथे भटकंती करताना दिसून आलं की हा देश खूप स्वच्छ आहे. सगळे रस्ते आणि परिसर साफ दिसत होता. बऱ्याच लोकांना वेगवेगळे देशांमध्ये गेल्यानंतर तिथलं मॅग्नेट गोळा करण्याचा छंद असतो. वेगवेगळ्या देशांत किंवा शहरांत मिळणाऱ्या मॅग्नेट किंवा लोहचुंबकावर त्या देशाची खासियत, त्या देशाचं नाव किंवा तिथल्या चांगल्या चांगल्या गोष्टी दाखवलेल्या असतात. हे मॅग्नेट त्या देशाची आठवण म्हणून सोबत ठेवता येतं. इथे माझ्या मित्राने हे मॅग्नेट घेतलं. अजून थोडाफार फेटफटका मारला. याशिवाय इथे आम्हाला आजूबाजूला जास्त काही दिसलं नाही. तसेच आम्हाला त्याच दिवशी इटलीला पोचायचं होतं. त्यामुळे आम्ही हा देश सोडायचं ठरवलं. भटकंती करण्याच्या छंदाने बरंच काही शिकवलं. त्यातलेच एक म्हणजे गोष्टी सोडून देणे. एखादी गोष्ट कितीही चांगली किंवा वाईट असली तरी वेळ आल्यावर तिचा मोह किंवा पाठलाग सोडून द्यावा. आयुष्याचा प्रवास असाच आहे. पुढे जायचे असेल तर फक्त आठवणी आणि शिकवणी मनात ठेवून पुढे चालत राहायचं.

अर्धा दिवस उलटत आला आणि एक नवीन देश पाहिल्याचे समाधान आम्हा सगळ्यांना मिळालं. खरं तर तिथल्या स्थानिक लोकांशी संवाद साधून तिथलं वेगळेपण जाणून घेता आलं असतं. तिथले वेगवेगळे खाद्यपदार्थ चाखता आले असते. पण वेळेअभावी आम्हाला काढता पाय घ्यावा लागला. आणि त्याचं शल्य फार काळ मनात टिकलं नाही. कारण ह्या देशाची सीमा पार केल्यावर पुढे आलेला देश होता - स्वित्झर्लंड.

तिथली झाडी आणि डोंगर पाहून इथे चित्रित झालेली बॉलीवूडमधली गाणी लगेच आम्ही एक सुरात म्हणू लागलो -

"तेरे मेरे होठोंपे मीठे मीठे गीत मितवा..."



समारोप

लिश्टनश्टाईनचा प्रवास तर संपला. पण कमी वेळात इथे जे जे अनुभवलं ते अजूनही मनात घर करुन कायम आहे. प्रत्येक प्रवासात आपल्याला नवनवीन गोष्टी शिकायला मिळतात. युरोपच्या या ट्रिपमध्ये आम्हाला अनेक ऑफबीट ठिकाणे गवसली. अशी बरीच गावे, जागा या जगाच्या कानाकोपऱ्यामध्ये दडलेली आहेत. प्रत्येक वेळी प्रवास करताना थोडंसं पाऊल वाकडं करून अशी वेगळी ठिकाणे सुद्धा पाहणे गरजेचे आहे. सुरुवातीला आम्ही प्लॅन केलं होतं तेव्हा हा देश आमच्या चेकलिस्टमध्ये नव्हता. मात्र तिथे आम्ही फिरलो. घरी परत आल्यानंतर नेटवर त्याची माहिती काढली तेव्हा कळलं की आपण एका अद्वितीय अशा देशाला भेट



दिली आहे. परिकथेत चितारलेला एक स्वप्नसुंदर देश आठवा असं कोणी म्हणलं तर डोळ्यांसमोर लिश्टनश्टाईन देश पहिला आठवेल हे मात्र नक्की!

साभार:

१. मुखपृष्ठ: Photo by Vincent M.A. Janssen: https://www.pexels.com/photo/brown-concrete-houses-near-trees-3123950/
२. https://pixabay.com/
३. विकिपीडिया

## लिश्टनश्टाईनची माहिती गुगलवरून साभार

लिश्टनश्टाईन हा मध्य युरोपमध्ये वसलेला एक छोटा, भूपरिवेष्टित देश आहे. पश्चिम आणि दक्षिणेला स्वित्झर्लंड आणि पूर्व आणि उत्तरेला ऑस्ट्रियामध्ये वसलेले, हे जगातील सर्वात लहान आणि सर्वात मनोरंजक राष्ट्रांपैकी एक आहे. केवळ 160 चौरस किलोमीटरचे क्षेत्रफळ आणि सुमारे 39,000 लोकसंख्या असलेले, लिश्टनश्टाईन त्याच्या इतिहास, अर्थव्यवस्था, राजकीय व्यवस्था आणि सांस्कृतिक वारसा यासह विविध पैलूंमध्ये त्याच्या अद्वितीय वैशिष्ट्यांसाठी उल्लेखनीय आहे. या सर्वसमावेशक शोधात, आम्ही लिश्टनश्टाईनच्या बहुआयामी स्वरूपाचा शोध घेऊ, त्याची ऐतिहासिक उत्क्रांती, राजकीय रचना, आर्थिक वातावरण आणि सांस्कृतिक महत्त्व यावर प्रकाश टाकू.

ऐतिहासिक पार्श्वभूमी

लिश्टनश्टाईनचा इतिहास हा युरोपियन सरंजामशाही, घराणेशाही आणि आधुनिक राज्यकलेचा एक टेपेस्ट्री आहे. हा प्रदेश पवित्र रोमन साम्राज्याचा भाग असताना 12व्या शतकात रियासतांची उत्पत्ती झाली. "लिश्टनश्टाईन" हे नाव स्वतः लिश्टनश्टाईन कुटुंबाकडून घेतले गेले आहे, ज्यांनी 1699 मध्ये हे क्षेत्र विकत घेतले. या कुटुंबाने, मूळचे सध्याचे ऑस्ट्रिया, रियासतीच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

लिश्टनश्टाईनची एक सार्वभौम राज्य म्हणून औपचारिक स्थापना 1806 मध्ये झाली जेव्हा ते नेपोलियनच्या फ्रेंच साम्राज्याचे क्लायंट राज्य, कॉन्फेडरेशन ऑफ द राइन अंतर्गत रियासत म्हणून उन्नत झाले. नेपोलियनच्या पतनानंतर आणि 1815 मध्ये व्हिएन्ना काँग्रेसमध्ये युरोपियन प्रदेशांची पुनर्रचना झाल्यानंतर, लिश्टनश्टाईन जर्मन कॉन्फेडरेशनचा सदस्य बनला. हा कालखंड लिश्टनश्टाईनच्या आधुनिक राजकीय मार्गाची सुरुवात म्हणून चिन्हांकित झाला, जरी तो मुख्यत्वे औपचारिक आणि कृषीप्रधान समाज राहिला.

20 व्या शतकाच्या सुरुवातीस, लिश्टनश्टाईनने आपल्या संस्थांचे आधुनिकीकरण करण्यास सुरुवात केली. 1921 च्या राज्यघटनेने राजकीय स्थिरता आणि विकासासाठी एक फ्रेमवर्क प्रदान करून घटनात्मक राजेशाही स्थापन केली. हा कालावधी महत्त्वपूर्ण आर्थिक आव्हानांनी चिन्हांकित केला होता, परंतु रियासतने या समस्यांना व्यावहारिक धोरणे आणि धोरणात्मक भागीदारीद्वारे नेव्हिगेट करण्यात व्यवस्थापित केले.

राजकीय रचना

लिश्टनश्टाईन ही लोकशाही आणि राजेशाही घटकांचे अद्वितीय मिश्रण असलेली घटनात्मक राजेशाही आहे. देशाची राजकीय व्यवस्था तिच्या द्वैतवादी

शासनाद्वारे वैशिष्ट्यीकृत आहे, जिथे सत्ता गाजवणारे राजपुत्र आणि निवडून आलेल्या प्रतिनिधींमध्ये सामायिक केले जाते.

सम्राट:

लिश्टनश्टाईनचा प्रिन्स हा राज्याचा प्रमुख आणि सरकारचा प्रमुख आहे. सध्याचा राजकुमार, हंस-ॲडम II, 1989 मध्ये सिंहासनावर आरूढ झाला. राजपुत्राकडे कायदे व्हेटो करण्याची आणि न्यायाधीशांची नियुक्ती करण्याची क्षमता यासह महत्त्वपूर्ण अधिकार आहेत. हे अधिकार असूनही, राजपुत्राची भूमिका मुख्यत्वे औपचारिक असते, निवडून आलेल्या संस्थांना महत्त्वपूर्ण अधिकार सोपवले जातात.

संसद:

लिश्टनश्टाईनची विधान मंडळ हे लँडटॅग आहे, चार वर्षांच्या मुदतीसाठी निवडून आलेल्या २५ सदस्यांचा समावेश असलेली एकसदनी संसद. लँडटॅग कायदे पारित करण्यासाठी, बजेट मंजूर करण्यासाठी आणि कार्यकारी शाखेवर देखरेख करण्यासाठी जबाबदार आहे. संसद आनुपातिक प्रतिनिधित्वाच्या चौकटीत कार्य करते, हे सुनिश्चित करते की विविध राजकीय पक्षांना विधान प्रक्रियेत आवाज आहे.

सरकार:

सरकारचे नेतृत्व पंतप्रधान करतात, ज्याची नियुक्ती राजकुमार करतो आणि सामान्यतः लँडटॅगमधील बहुसंख्य पक्ष किंवा युतीचा नेता असतो. पंतप्रधान सरकारचे प्रमुख असतात आणि सार्वजनिक व्यवहारांच्या प्रशासनावर देखरेख करतात. धोरणांची अंमलबजावणी आणि राज्याच्या दैनंदिन कामकाजाचे व्यवस्थापन करण्याची जबाबदारी सरकारची असते.

न्यायव्यवस्था:

कायद्याचे राज्य टिकवून ठेवण्यावर आणि न्याय सुनिश्चित करण्यावर लक्ष केंद्रित करून लिश्टनश्टाईनची न्यायिक प्रणाली स्वतंत्र आहे. न्यायपालिका एक घटनात्मक न्यायालय बनलेली आहे, जी घटनात्मक कायद्याशी संबंधित प्रकरणांवर देखरेख करते आणि एक सामान्य न्यायालय प्रणाली जी दिवाणी, फौजदारी आणि प्रशासकीय प्रकरणे हाताळते.

अर्थव्यवस्था

लिश्टनश्टाईनची अर्थव्यवस्था ही त्याच्या सर्वात उल्लेखनीय बाबींपैकी एक आहे, ज्याची उच्च पातळीची समृद्धी, स्थिरता आणि नवकल्पना आहे. त्याचे आकार लहान असूनही, रियासतने एक अत्यंत यशस्वी आर्थिक मॉडेल विकसित केले आहे.

आर्थिक सेवा:

लिश्टनश्टाईनच्या अर्थव्यवस्थेचा एक पाया म्हणजे त्याचे वित्तीय सेवा क्षेत्र. देशामध्ये एक सुस्थापित बँकिंग प्रणाली आहे जी तिच्या विवेकबुद्धी, स्थिरता आणि कौशल्यासाठी ओळखली जाते. अनुकूल नियामक वातावरण, मजबूत गोपनीयता कायदे आणि आकर्षक कर धोरणांमुळे आंतरराष्ट्रीय ग्राहकांना आकर्षित करणारे हे जागतिक आर्थिक केंद्र मानले जाते.

उद्योग आणि वाणिज्य:

लिश्टनश्टाईन मजबूत औद्योगिक क्षेत्रासह वैविध्यपूर्ण अर्थव्यवस्थेचा अभिमान बाळगतो. देशात अनेक बहुराष्ट्रीय कॉर्पोरेशन आणि लहान ते मध्यम आकाराचे उद्योग (SMEs) आहेत जे अचूक उपकरणे, इलेक्ट्रॉनिक्स आणि

यंत्रसामग्रीसह विविध क्षेत्रात विशेष आहेत. प्रिन्सिपॅलिटीचा औद्योगिक पाया उच्च-मूल्य-वर्धित उत्पादने आणि तांत्रिक नवकल्पना द्वारे वैशिष्ट्यीकृत आहे.

पर्यटन:

लिश्टनश्टाईनच्या अर्थव्यवस्थेत पर्यटन महत्त्वपूर्ण भूमिका बजावते, जरी ते आर्थिक आणि औद्योगिक क्षेत्रांच्या तुलनेत कमी प्रमुख आहे. देशातील नयनरम्य लँडस्केप, मोहक गावे आणि ऐतिहासिक स्थळे सांस्कृतिक अनुभव आणि बाह्य क्रियाकलाप दोन्ही शोधणाऱ्या अभ्यागतांना आकर्षित करतात. लोकप्रिय पर्यटन स्थळांमध्ये मध्ययुगीन शहर वडूझ, लिश्टनश्टाईन राष्ट्रीय संग्रहालय आणि स्विस आल्प्समधील हायकिंग ट्रेल्सचा समावेश आहे.

कर आकारणी आणि व्यवसाय वातावरण:

लिश्टनश्टाईन त्याच्या अनुकूल व्यावसायिक वातावरणासाठी प्रसिद्ध आहे, ज्यामध्ये कमी कॉर्पोरेट कर दर आणि स्पर्धात्मक नियामक फ्रेमवर्क समाविष्ट आहे. रियासतने स्वतःला आंतरराष्ट्रीय व्यवसाय आणि गुंतवणुकीचे केंद्र म्हणून स्थापित केले आहे, काही अंशी त्याचे राजकीय स्थैर्य, अत्यंत कुशल कर्मचारी वर्ग आणि युरोपच्या मध्यभागी असलेले धोरणात्मक स्थान यामुळे.

सांस्कृतिक वारसा

लिश्टनश्टाईनचा सांस्कृतिक वारसा त्याच्या जर्मन भाषिक शेजारी आणि त्याच्या अद्वितीय स्थानिक चालीरीतींच्या परंपरांचे मिश्रण प्रतिबिंबित करतो.

देशाची समृद्ध सांस्कृतिक टेपेस्ट्री त्याच्या कला, वास्तुकला, उत्सव आणि दैनंदिन जीवनातून व्यक्त केली जाते.

आर्किटेक्चर:

लिश्टनश्टाईनचे आर्किटेक्चरल लँडस्केप ऐतिहासिक आणि आधुनिक शैलींचे मिश्रण आहे. राजधानीचे शहर, वडूझ, हे प्रतिष्ठित वडूझ किल्लेवजा वाडा आहे, जो रियासतीच्या ऐतिहासिक मुळे आणि राजेशाही वारशाचे प्रतीक आहे. याउलट, लिश्टनश्टाईनमधील आधुनिक वास्तुकला अनेकदा नाविन्यपूर्ण डिझाइन आणि कार्यक्षमता दर्शवते, जी प्रगती आणि विकासासाठी देशाची वचनबद्धता दर्शवते.

सण आणि परंपरा:

लिश्टनश्टाईनर्स त्यांच्या सांस्कृतिक वारशावर प्रकाश टाकणारे विविध सण आणि परंपरा साजरे करतात. देशाच्या स्वातंत्र्य आणि राष्ट्रीय अस्मितेचे स्मरण म्हणून 15 ऑगस्ट रोजी साजरा केला जाणारा लिश्टनश्टाईन राष्ट्रीय दिवस सर्वात लक्षणीय आहे. इतर पारंपारिक उत्सवांमध्ये फास्नाच्ट, रंगीबेरंगी पोशाख, परेड आणि सामुदायिक मेळाव्याद्वारे चिन्हांकित कार्निव्हल सारखा उत्सव समाविष्ट आहे.

कला आणि संगीत:

रियासत एक दोलायमान कला देखावा आहे, असंख्य गॅलरी आणि सांस्कृतिक संस्था स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय प्रतिभेचे प्रदर्शन करतात. लिश्टनश्टाईन नॅशनल म्युझियम आणि कुन्स्टम्युझियम लिश्टनश्टाईन ही प्रमुख

सांस्कृतिक ठिकाणे आहेत जी देशाच्या कलात्मक कामगिरीवर प्रकाश टाकणारी प्रदर्शने आणि कार्यक्रम आयोजित करतात.

पाककृती:

लिश्टनश्टाईनचे पाककृती मध्य युरोपीय प्रभाव प्रतिबिंबित करते, ज्यामध्ये बऱ्याचदा हार्दिक, आरामदायी अन्न घटक असतात. पारंपारिक पदार्थांमध्ये रोस्टी (स्विस-शैलीतील बटाटा डिश), ब्रॅटवर्स्ट (सॉसेज) आणि विविध पेस्ट्री आणि मिष्टान्न यांचा समावेश होतो. देशाच्या पाककृती अर्पण त्याच्या समृद्ध सांस्कृतिक वारसा आणि प्रादेशिक स्वादांचा पुरावा आहे.

आंतरराष्ट्रीय संबंध

लिश्टनश्टाईनचे आंतरराष्ट्रीय संबंध युरोपमधील धोरणात्मक स्थिती आणि शेजारील देश आणि जागतिक भागीदारांसोबत मजबूत राजनैतिक आणि आर्थिक संबंध राखण्याच्या त्याच्या वचनबद्धतेद्वारे चिन्हांकित आहेत.

युरोपियन एकत्रीकरण:

जरी लिश्टनश्टाईन युरोपियन युनियन (EU) चा सदस्य नसला तरी, त्याने युरोपियन इकॉनॉमिक एरिया (EEA) मधील सदस्यत्वाद्वारे EU शी जवळचे संबंध प्रस्थापित केले आहेत. या व्यवस्थेमुळे लिश्टनश्टाईनला त्याचे सार्वभौमत्व कायम राखून एकल युरोपियन बाजारपेठेत सहभागी होता येते.

आंतरराष्ट्रीय संस्था:

युनायटेड नेशन्स (UN), इंटरनॅशनल मॉनेटरी फंड (IMF) आणि जागतिक व्यापार संघटना (WTO) यासह विविध आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये लिश्टनश्टाईन सक्रिय सहभागी आहे. या संस्थांमधील रियासतांचा सहभाग जागतिक सहकार्य आणि आंतरराष्ट्रीय मानकांचे पालन करण्याची त्यांची वचनबद्धता प्रतिबिंबित करतो.

राजनैतिक संबंध:

लिश्टनश्टाईनने जगभरातील देशांशी राजनैतिक संबंधांचे जाळे राखले आहे. त्याचे परराष्ट्र धोरण मुत्सद्दीपणा, तटस्थता आणि मानवी हक्कांच्या संवर्धनावर लक्ष केंद्रित करते. देशाच्या राजनैतिक प्रयत्नांचा उद्देश शांततापूर्ण संबंध वाढवणे आणि जागतिक स्थिरतेला हातभार लावणे आहे.

आव्हाने आणि संधी

लिश्टनश्टाईनला आव्हाने आणि संधी या दोन्हींचा सामना करावा लागतो कारण तो आधुनिक जगाच्या गुंतागुंतीकडे नेव्हिगेट करतो. काही प्रमुख आव्हानांमध्ये हे समाविष्ट आहे:

आर्थिक विविधता:

लिश्टनश्टाईनची अर्थव्यवस्था मजबूत असताना, दीर्घकालीन टिकाव सुनिश्चित करण्यासाठी विविधीकरणाची सतत गरज आहे. रियासत आपली आर्थिक लवचिकता वाढवण्यासाठी आणि पारंपारिक उद्योगांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी तंत्रज्ञान आणि नवकल्पना यासारख्या क्षेत्रांमध्ये गुंतवणूक करत आहे.

हवामान बदल:

बऱ्याच लहान राष्ट्रांप्रमाणे, लिश्टनश्टाईन हे हवामान बदलाच्या प्रभावांना असुरक्षित आहे. शाश्वत पद्धती, हरित ऊर्जा उपक्रम आणि संवर्धन प्रयत्नांद्वारे पर्यावरणीय समस्यांचे निराकरण करण्यासाठी रियासत पावले उचलत आहे.

जागतिकीकरण:

वाढत्या जागतिकीकरणाच्या जगात, लिश्टनश्टाईनने डायनॅमिक आंतरराष्ट्रीय लँडस्केपच्या मागणीसह त्याच्या पारंपारिक मूल्यांचा समतोल राखला पाहिजे. रियासत आपली वेगळी ओळख जपत स्पर्धात्मक राहण्यासाठी आपली धोरणे आणि धोरणे स्वीकारत आहे.

वाढीच्या संधी:

लिश्टनश्टाईनचे धोरणात्मक स्थान, व्यवसायासाठी अनुकूल वातावरण आणि उच्च दर्जाचे जीवन यामुळे वाढीच्या महत्त्वपूर्ण संधी आहेत. आंतरराष्ट्रीय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी, नवनिर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि जागतिक वित्तीय केंद्र म्हणून आपली भूमिका वाढवण्यासाठी देश सुस्थितीत आहे.

निष्कर्ष

लिश्टनश्टाईन हा एक असा देश आहे जो त्याच्या समृद्ध इतिहास, गतिमान अर्थव्यवस्था आणि दोलायमान सांस्कृतिक वारसा याद्वारे त्याच्या लहान आकाराचा अवमान करतो. त्याची राजकीय रचना, राजेशाही आणि लोकशाहीच्या मिश्रणाने वैशिष्ट्यीकृत, शासनाचे एक अद्वितीय मॉडेल प्रदान करते. रियासतचे आर्थिक यश

आर्थिक सेवा, औद्योगिक पराक्रम आणि पर्यटनाच्या पायावर बांधले गेले आहे, तर तिची सांस्कृतिक परंपरा ओळख आणि अभिमानाची खोल भावना दर्शवते.

लिश्टनश्टाईनने 21 व्या शतकातील आव्हाने आणि संधींवर नेव्हिगेट करणे सुरू ठेवल्याने, ते लवचिकता, नवकल्पना आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याचे प्रतीक आहे. मध्ययुगीन राज्यातून आधुनिक, समृद्ध राज्यापर्यंतचा तिचा प्रवास हा तेथील लोकांच्या चिरस्थायी भावनेचा आणि संस्थांच्या ताकदीचा पुरावा आहे.

## पर्यटकांसाठी टिप्स (AI generated)

नयनरम्य लँडस्केप्स, समृद्ध इतिहास आणि अनोखे सांस्कृतिक ऑफर दिल्यास, लिश्टनश्टाईनला प्रवास करणे हा एक आनंददायी अनुभव असू शकतो. लहान आकार असूनही, रियासत अनेक क्रियाकलाप आणि आकर्षणे देते ज्यामुळे ते एक फायदेशीर गंतव्यस्थान बनते. लिश्टनश्टाईनच्या सहलीचा अधिकाधिक वापर करण्यात मदत करण्यासाठी येथे काही आवश्यक प्रवास टिपा आहेत:

1. तुमच्या भेटीचे नियोजन

भेट देण्यासाठी सर्वोत्तम वेळ:

वसंत ऋतु (एप्रिल ते जून): आल्हाददायक हवामान आणि कमी पर्यटकांमुळे वसंत ऋतू हा लिश्टनश्टाईनच्या बाह्य क्रियाकलाप आणि नैसर्गिक सौंदर्याचा शोध घेण्यासाठी उत्तम वेळ ठरतो.

उन्हाळा (जुलै ते सप्टेंबर): हायकिंग, सायकलिंग आणि मैदानी सणांचा आनंद घेण्यासाठी आदर्श. हा सर्वाधिक पर्यटन हंगाम आहे, त्यामुळे अधिक गर्दीची अपेक्षा करा.

शरद ऋतूतील (ऑक्टोबर ते नोव्हेंबर): शरद ऋतूतील पर्णसंभार आणि थंड तापमानाचा आनंद घ्या. कमी पर्यटकांसह, भेट देण्यासाठी हा एक शांत वेळ आहे.

हिवाळा (डिसेंबर ते मार्च): हिवाळी क्रीडा प्रेमींसाठी योग्य. हा प्रदेश स्कीइंग आणि स्नोबोर्डिंगच्या संधी देते, विशेषत: जवळच्या स्विस रिसॉर्ट्समध्ये.

मुक्कामाचा कालावधी:

लिश्टनश्टाईनची भेट 2 ते 3 दिवसांत आरामात व्यवस्थापित केली जाऊ शकते. हे मुख्य आकर्षणे एक्सप्लोर करण्यासाठी, बाह्य क्रियाकलापांचा आनंद घेण्यासाठी आणि स्थानिक संस्कृतीचा अनुभव घेण्यासाठी पुरेसा वेळ देते.

2. तेथे आणि आसपास पोहोचणे

आगमन:

हवाई मार्गे: सर्वात जवळचे प्रमुख विमानतळ झुरिच (स्वित्झर्लंड) आणि फ्रेडरिकशाफेन (जर्मनी) येथे आहेत. या विमानतळांवरून, तुम्ही लिश्टनश्टाईनला जाण्यासाठी ट्रेन किंवा बसने जाऊ शकता.

ट्रेनने: लिश्टनश्टाईनचे स्वतःचे रेल्वे स्टेशन नाही, परंतु तुम्ही जवळच्या सरगन्स किंवा बुच या स्विस शहरांमध्ये ट्रेन घेऊ शकता आणि नंतर लिश्टनश्टाईनला जाण्यासाठी स्थानिक बस वापरू शकता.

कारने: ड्रायव्हिंग हा एक सोयीस्कर पर्याय आहे. स्वित्झर्लंड आणि ऑस्ट्रिया येथून कारने सहज प्रवेश करता येतो.

स्थानिक वाहतूक:

सार्वजनिक वाहतूक: बसेस हे लिश्टनश्टाईनमधील सार्वजनिक वाहतुकीचे प्राथमिक साधन आहे. लिश्टनश्टाईन बस कंपनी प्रमुख शहरे आणि आकर्षणे जोडणारे मार्ग चालवते.

कार भाड्याने देणे: कार भाड्याने घेणे आपल्या स्वतःच्या गतीने प्रदेश एक्सप्लोर करण्यासाठी उपयुक्त आहे. तथापि, काही भागात पार्किंग मर्यादित असू शकते, म्हणून आगाऊ उपलब्धता तपासा.

सायकलिंग: लिश्टनश्टाईन हे बाइक-अनुकूल आहे, अनेक चांगले चिन्हांकित सायकलिंग मार्ग आहेत.

3. निवास

निवासाचे प्रकार:

हॉटेल्स: लिश्टनश्टाईन लक्झरीपासून बजेट पर्यायांपर्यंत अनेक हॉटेल्स ऑफर करते. लोकप्रिय पर्यायांमध्ये वडूझमधील हॉटेल वडुझेरहॉफ आणि पार्क हॉटेल सोनेनहॉफ यांचा समावेश आहे.

अतिथीगृहे: अधिक घनिष्ट अनुभवासाठी, अतिथीगृह किंवा बेड आणि ब्रेकफास्टमध्ये राहण्याचा विचार करा.

सुट्टीतील भाड्याने: अपार्टमेंट आणि हॉलिडे होम्स वडूझ आणि शान सारख्या शहरांमध्ये आढळू शकतात, लवचिकता आणि आराम देतात.

बुकिंग टिप्स:

आगाऊ निवास बुक करा, विशेषतः पीक पर्यटन हंगामात.

जर तुम्हाला लिश्टनश्टाईनमध्येच योग्य निवासस्थान सापडत नसेल तर जवळच्या स्विस किंवा ऑस्ट्रियन शहरांमध्ये राहण्याचा विचार करा.

4. भाषा आणि संप्रेषण

भाषा:

अधिकृत भाषा जर्मन आहे. विशेषत: पर्यटन क्षेत्र, हॉटेल आणि रेस्टॉरंटमध्ये इंग्रजी मोठ्या प्रमाणावर समजली जाते.

संप्रेषण टिपा:

स्थानिकांशी तुमचा संवाद वाढवण्यासाठी काही मूलभूत जर्मन वाक्ये जाणून घ्या.

मोबाइल कव्हरेज सामान्यतः चांगले असते आणि बहुतेक हॉटेल, रेस्टॉरंट आणि सार्वजनिक ठिकाणी वाय-फाय उपलब्ध आहे.

5. चलन आणि देयके

चलन:

लिश्टनश्टाईन स्विस फ्रँक (CHF) वापरतो, युरो नाही. काही व्यवसाय युरो स्वीकारू शकतात, परंतु व्यवहारांसाठी स्विस फ्रँक वापरणे चांगले.

पेमेंट पद्धती:

क्रेडिट आणि डेबिट कार्ड मोठ्या प्रमाणावर स्वीकारले जातात. छोट्या खरेदीसाठी किंवा कार्ड पेमेंट कमी सामान्य असलेल्या भागात तुम्ही भेट दिल्यास काही रोख रक्कम घेऊन जाणे ही चांगली कल्पना आहे.

एटीएम:

एटीएम संपूर्ण लिश्टनश्टाईनमध्ये उपलब्ध आहेत, विशेषत: वडूझ आणि शान सारख्या शहरांमध्ये. तुमची बँक आकारू शकणाऱ्या कोणत्याही परकीय व्यवहार शुल्काबद्दल जागरूक रहा.

6. स्थानिक पाककृती आणि जेवण

स्थानिक पाककृती:

लिश्टनश्टाईनच्या पाककृतीवर स्विस, ऑस्ट्रियन आणि जर्मन पाककृती परंपरांचा प्रभाव आहे. लोकप्रिय पदार्थांमध्ये हे समाविष्ट आहे:

Rösti: स्विस-शैलीतील बटाटा डिश.

Käsknöpfle: स्विस-शैलीतील चीज डंपलिंग.

Wiener Schnitzel: एक ब्रेड आणि तळलेले वासराचे कटलेट.

टॉर्टे: रिच केक आणि पेस्ट्री बहुतेकदा कॉफीचा आनंद घेतात.

जेवणाच्या टिप्स:

पारंपारिक पदार्थांचा अनुभव घेण्यासाठी स्थानिक रेस्टॉरंट्स आणि कॅफे वापरून पहा.

लोकप्रिय जेवणाच्या ठिकाणांसाठी आरक्षणाची शिफारस केली जाते, विशेषत: पीक पर्यटन हंगामात.

7. सांस्कृतिक शिष्टाचार

परंपरांचा आदर:

लिश्टनश्टाईन हा पारंपारिक आणि पुराणमतवादी देश आहे. चर्च किंवा औपचारिक आस्थापनांना भेट देताना विनम्र कपडे घाला.

वक्तशीरपणाचे मूल्य आहे, म्हणून भेटी किंवा टूरसाठी वेळेवर रहा.

टिपिंग:

टिप देणे अनिवार्य नाही पण कौतुक आहे. सेवा शुल्क सहसा तुमच्या बिलामध्ये समाविष्ट केले जाते, परंतु रक्कम गोळा करणे किंवा चांगल्या सेवेसाठी एक छोटी टीप देणे नेहमीचा आहे.

8. प्रेक्षणीय स्थळे आणि उपक्रम

आवश्यक आकर्षणे:

वडूझ किल्ला: लिश्टनश्टाईनच्या राजकुमाराचे अधिकृत निवासस्थान. आतील भाग लोकांसाठी खुला नसला तरी, तुम्ही बाहेरील दृश्यांचा आनंद घेऊ शकता.

लिश्टनश्टाईन नॅशनल म्युझियम: रियासतीच्या इतिहास आणि संस्कृतीबद्दल अंतर्दृष्टी ऑफर करते.

Kunstmuseum Liechtenstein: समकालीन कला दाखवते आणि कलाप्रेमींसाठी भेट देण्यासारखे आहे.

गुटेनबर्ग किल्ला:

• गुटेनबर्ग किल्ला: गुटेनबर्ग शहरात स्थित, हा मध्ययुगीन किल्ला आजूबाजूच्या परिसराची विहंगम दृश्ये देतो.

• हायकिंग आणि निसर्ग: लिश्टनश्टाईन आल्प्स आणि रग्गेलर रिएट निसर्ग राखीव मधील निसर्गरम्य हायकिंग ट्रेल्स एक्सप्लोर करा.

बाह्य क्रियाकलाप:

• हायकिंग आणि सायकलिंग: असंख्य ट्रेल्स आणि मार्ग नवशिक्या आणि अनुभवी उत्साही दोघांनाही पुरवतात.

• स्कीइंग आणि स्नोबोर्डिंग: जवळील स्विस रिसॉर्ट्स हिवाळयातील खेळांच्या उत्कृष्ट संधी देतात.

9. आरोग्य आणि सुरक्षितता

आरोग्य खबरदारी:

• लिश्टनश्टाईनच्या प्रवासासाठी कोणत्याही विशिष्ट लसीकरणाची आवश्यकता नाही. तथापि, वैद्यकीय खर्च कव्हर करणारा प्रवास विमा असणे केव्हाही चांगले.

• नळाचे पाणी पिण्यासाठी सुरक्षित आहे.

सुरक्षितता:

• लिश्टनश्टाईन जगातील सर्वात सुरक्षित देशांपैकी एक आहे. सामान्य सुरक्षा पद्धती लागू होतात, जसे की तुमच्या वस्तूंवर लक्ष ठेवणे आणि अपरिचित भागात सावध राहणे.

10. आपत्कालीन संपर्क

आणीबाणी क्रमांक:

• पोलीस: 117

• अग्निशमन विभाग: 118

• वैद्यकीय आणीबाणी: 144

दूतावास आणि वाणिज्य दूतावास:

• लिश्टनश्टाईनचे स्वतःचे दूतावास नसताना, आपत्कालीन परिस्थितीत तुम्ही स्विस किंवा ऑस्ट्रियन दूतावासांकडून मदत घेऊ शकता.

निष्कर्ष

ऐतिहासिक आकर्षण, आधुनिक सुविधा आणि विस्मयकारक नैसर्गिक लँडस्केप यांचे मिश्रण असलेले लिश्टनश्टाईन एक अनोखा प्रवास अनुभव देते. आगाऊ योजना करून, स्थानिक चालीरीती समजून घेऊन आणि रियासतचा समृद्ध सांस्कृतिक वारसा स्वीकारून, तुम्ही युरोपच्या या मोहक कोपर्यात तुमच्या भेटीचा पुरेपूर फायदा घेऊ शकता. तुम्ही मध्ययुगीन किल्ले एक्सप्लोर करत असाल, मैदानी साहसांचा आनंद घेत असाल किंवा स्थानिक खाद्यपदार्थांचा आस्वाद घेत असाल, लिश्टनश्टाईन निश्चितपणे कायमची छाप सोडेल.

# जग सुंदर आहेच.

पण त्याचे सौंदर्य खुलवणारे शब्द व दृष्टी आपल्याला लेखक अणि कवी देतात.

**केशवसुत म्हणतात**

**पाणिस्पर्शच आमुचा शकतसे वस्तूंप्रती द्यावया –**

**सौंदर्यातिशया, अशी वसतसे जादु करांमाजि या;**

लेखकांच्या आणि कवींच्या शब्दस्पर्शाने आम्हाला आमच्या आजूबाजूच्या निसर्गातले आणि निर्जीव दगडांतले, पाण्यातले सौंदर्य "जाणवू" लागले. प्रवासवर्णने वाचून आपलेही पाय शिवशिवायला लागतात, त्यांनाही ओढ लागते त्या त्या दिशांची, त्या त्या देशांची.

ई साहित्यचा प्रवासवर्णन विभाग काहींच्या मते खूप समृद्ध आहे. जगातले अनेक देश, भारतातली अनेक राज्ये आणि महाराष्ट्रातले अनेक जिल्हे आणि किल्ले यांची सखोल आणि सचित्र माहिती देणारी भरपूर पुस्तके ई साहित्यने प्रकाशित केली. पण आम्ही अजिबातच समाधानी नाही. महाराष्ट्रातला प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका आणि प्रत्येक गाव सुंदर आहे. आणि त्याचं सौंदर्य पाहू शकेल असा कोणीही दिव्यदृष्टीचा पाईक आमच्या या "मी पाहिलेला…" सिरीजमध्ये भाग घेऊ शकतो.

आपण जिथे कुठे प्रवास केला असेल, त्याचं वर्णन द्या.

आपण आपल्या स्वतःच्या गावाचं वर्णन द्या.

आपण आपल्या आवडत्या कोणत्याही गावाचे, किंवा जिल्ह्याचे वर्णन द्या.

आपलं आजोळ असो वा माहेर किंवा सासुरवाडी, आम्हाला त्याचा महिमा कळवा.

आणि हो, सोबत भरपूर फ़ोटो पाठवा.

तुम्ही पाठवलेली माहिती एखाद्या प्रवाशाला आकृष्ट करेल

किंवा ज्यांनी आधीच प्लॅन केला त्यांना मार्गदर्शक ठरेल

किंवा ज्यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरता येत नाही त्यांना सहलीचा आनंद देईल

किंवा परदेशात राहून भारतावर प्रेम करणाऱ्या बंधू भगिनींना आपल्या देशाच्या कोनाकोपऱ्याचं दर्शन घडवेल. कृपया लिहा

esahity@gmail.com

www.esahity.com

9987737237 (WhatsApp)